धक्का!! सुराज्य सोलापूर
शनिवार, दि. २ नोव्हेंबर २०२४ । पान १२






# चल कलटी मार...

# जोर का झटका... जोरसेही लगा!



✔ सोलापूर/प्रतिनिधी

‘परिवर्तन’ हा निसर्गाचा नियम राजकारणाला सर्वाधीक लागू पडतो. राजकारण हे नेहमीच बदलतं असतं. इथं कायमचं तसं काहीच नसतं. राजकारणात काय घडवलं जाईल, शिवाय कधी काय घडेल, हे सांगता येत नाही. कार्यकर्त्याला दिलेला शब्द पूर्ण पाळला जाईल की नाही, याची कधीच खात्री देता येत नाही. वेळप्रसंगी शब्द फिरविण्याचं नाटकं अत्यंत पद्धतशिरीत्या वठवलं जातं. ‘अंगलट आलं की कलटी मारणं’ हे इथलं तसं जुनंच समीकरण. याच ‘चल कलटी मार’ या समीकरणाचा धोरणाचा प्रत्यय विधानसभेच्या या निवडणुकीत आला, ज्यानं कैक इच्छुकांच्यापुढे दिवस जणू काजवे चमकले, पायाखालची वाळू सरकली, मती गुंग झाली, अनेकांना कात्रजचा घाट दाखवला गेला. त्यातून संतापाचा उद्वेग बाहेर पडला. नको हे असलं गलिच्छ अन् खपवाखपवीचे राजकारण असे स्वगत शब्दही ओठावर आले. पण करणार काय शेवटी राजकारण जे राजकारण अन् शब्द फिरविणारे राजकारणी ते राजकारणी.







यंदाच्या लक्षवेधी विधानसभेच्या निवडणुकीत सोलापूर जिल्ह्याच्या बाबतीत ‘चल कलटी मार’ फेम नेते ठरले ते राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे आणि खासदार प्रणिती शिंदे. या संबंधित नेतेमंडळींच्या ‘चल कलटी मार’ धोरणानं दिलीप माने, नरसय्या आडम, महादेव कोगनुरे, भगीरथ भालके, धर्मराज काडादी आदींना ‘जोर का झटका बहुतसे लगा’ म्हणण्याची वेळ आली.

युवा नेतृत्व प्रणिती शिंदेंच्या शब्द फिरविण्यानं माजी आमदार दिलीप माने आणि आडम मास्तर यांची चांगलीच बेजारी झाली. काँग्रेसच्या वाट्याची सोलापूर शहरची जागा शिवसेना अलगदपणे सोडून राजकारणाच्या डावाचे बळी पडले दिलीप माने.

## ‘हास्य’ लोपलं ते मुंबापुरीतच

काँग्रेस समितीचे जिल्हाध्यक्ष सुरेश हसापुरे यांनादेखील सोलापूर शहर दक्षिणमधून लढण्याच्या आश्वसनाचं चॉकलेट शिंदे पिता-कन्येकडून वर्षभर दिलं जात होतं. या चॉकलेटचा मोहिनी हसापुरे यांनादेखील पडली होती. मात्र, दक्षिणची जागा शिवसेनेला सुटली आणि त्यानंतर जे महाभारत घडत होतं त्यादरम्यान सुरेश हसापुरे हे मुंबईत ठाण मांडून होते. उमेदवारीत खपवाखपवीचं चालेलं राजकारण पाहण्याबरोबरच,उमेदवारी मिळण्यात आपली डाळ शिजत नसल्याचं जेव्हा काँग्रेसच्या कार्याध्यक्षांना कळलं त्यावेळी त्यांच्या चेहऱ्यावरचं ‘हास्य’ लोपल्याची चर्चा त्यांच्या समर्थकांमध्ये झाली. दिलीप मानेंच्या उमेदवारीसंबंधी जे घडत होतं त्यावरुन हसापुरे समर्थकांमध्ये आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. पण जेव्हा आपल्या गॉडफादरची संधी घालवली हे लक्षात आलं तेव्हा हसापुरे समर्थकांमध्ये सन्नाटा पसरला. ‘सुपातील दाण्यांनी जात्यामधील दाण्यांना हासू नये’ हे गणित त्या समर्थकांना कळलं असावं.

## शरद पवारांच्या डावावर भालके गार; ‘वरुन कीर्तन आतून तमाशा’चा प्रत्यय

पंढरपूरची जागा आपल्या पक्षाकडे घेऊन त्या जागेवर भगीरथ भालकेंना उमेदवारी देण्याची अटकळ बांधत तशा सोंगट्या टाकून भालकेंना शरद पवारांनी नादी लावले. भालकेंना तुतारीचा नाद लागला. तुतारीच्या चिन्हावर आमदार झाल्याची स्वप्ने पडली. मात्र, शरद पवारांनी भालकेंना चंद्रभागा तिराचा नव्हे, तर कात्रजचा घाट दाखविला. पंढरपूरची जागा काँग्रेसला सोडून या जागेवरुन काँग्रेसची उमेदवारी भालकेंच्या गळ्यात घालतानाच, शरद पवारांनी अनिल सावंत यांना आखाड्यात उतण्यास भाग पाडून स्वत:च्य पक्षाचा एबी फॉर्म दिला. भालकेंची लढण्याची मोठी पंचाईत झाली. शरद पवारांच्या पंढरपुरातून लढण्याच्या डावावर भालके गार तर झालेच झाले. पण शरद पवारांच्या ‘वरुन कीर्तन आतून तमाशा’चा प्रत्यय त्यांना आला असावा.



### प्रणिती आता म्हणताहेत; एबी फॉर्म देणं प्रदेशाध्यक्षांचं काम

दक्षिणची जागा काँग्रेसच लढविणार, दिलीप माने हेच तिथले काँग्रेसचे उमेदवार आहेत, त्यांची उमेदवारी निश्चित आहे, मी त्यांच्यासाठीच्या पक्षाच्या अधिकृत उमेदवारीचा एबी फॉर्म घेऊन ठेवला आहे, असं सांगणाऱ्या प्रणिती शिंदेंनी गुरुवारी चल कलटी मार भूमिका वठवली.‘एबी फॉर्म देणं प्रदेशाध्यक्षांचं काम आहे, मी कसा देणार एबी फॉम?’ असं थेटच सांगत प्रणितींनी उमेदवारीच्या राजकारणाच्या नाट्याचा शेवट केल्याची चर्चा सुरु आहे.



### आडम मास्तरांना प्रणिती म्हणताहेत; दाखवा लेखी पुरावे

‘सोलापूर लोकसभेच्या बदल्यात सोलापूर शहर मध्य विधानसभा’ असा साट्यालोट्याचा तह लोकसभा निवडणुकीवेळी काँग्रेस आणि माकप यांच्यात झाला होता, असं घसा कोरडा होईपर्यंत ठासून सांगणारे आडम मास्तरांनी प्रणिती शिंदेंनी काय शिजवलं? याबद्दलचे बॉम्ब फोडू असे म्हणताच, कायद्याची पदवी घेतलेल्या प्रणिती शिंदे यांनी पलटवार करीत आडम मास्तरांना वकिली पाईंटमध्ये घेतले.शहर मध्य माकपला देऊ नये, असे मी म्हटल्याचे ऑन रेकॉर्ड, ऑफ द रेकॉर्ड किंवा माझ्या स्वाक्षरीचे पत्र असेल तर आडम यांनी मला दाखवावे, तसा प्रकारचे वक्तव्य कुठे केल्याचे त्यांनी सांगावे, असा सवाल प्रणितींनी शिंदे यांनी आडमांना करुन त्यांची आरोपांमधील हवा काढण्याचा प्रयत्न केला आहे.



### पवारांनी काडादींना खपवलं; नाद केला खरा पण वाया गेला

काँग्रेसच्या दक्षिणच्या जागेवर मध्यल्यामध्येच शरद पवारांनी आपल्या गटाचा हक्क सांगत, साखर सम्राट धर्मराज काडादींना निवडणुकीची तयारी करायला लावली. मात्र, उमेदवारी देण्यात त्यांना खपवलं. काडादींची आता मध्यल्यामध्येच गोची झाली आहे. शरद पवार राष्ट्रवादी किंवा काँग्रेस कोणाचीच अधिकृत उमेदवारी न मिळाल्यानं काडादी उमेदवारीशिवाय लटकून राहिले. उभे राहाचंय म्हटलं तर पक्षाची उमेदवारी नाही अन् अपक्ष लढायचं म्हटलं तर विजयाची खात्री नाही. विधानसभा लढण्यासाठी इच्छुक नसणाऱ्या काडादींना शरद पवारांनी नाद लावला खरा पण आता त्यांच्यावर नाद केला पण वाया गेला असे म्हणण्याची वेळ आली आहे.



### कोगनुरेंना नाद लावला; पण त्यांनी धरले रेल्वे इंजिन

दक्षिणच्या जागेवरुन महादेव कोनगुरे यांनादेखील उमेदवारीचा नाद लावण्यात आला होता. त्यासाठी जनवात्सल्यसह आणि काँग्रेस भवन या ठिकाणची वाट कोनगुरेंनी पांढरी केली. जनवात्सल्यच्या उंबरठे झिजवले. पण काँग्रेसने त्यांना उमेदवारीसंबंधी ‘हात’ नाही दिला. कोगनुरेंनी पर्याय काढत रेल्वे इंजिन धरलं. विश्वासघाताच्या आपटबारमध्ये खाक होण्यापेक्षा त्यांनी इंजिन रेल्वेवर स्वार होणं पसंत केलं.



# सोलापूरचं वारं फिरवणार!

✔ सोलापूर/प्रतिनिधी

लोकसभेला मोठी ताकद लावूनदेखील मानहानीकारक पराभवाची धूळ चाखाव्या लागलेल्या भाजपनं राज्यामधील विधानसभेच्या निवडणुकीसाठी फिरसे जोरसे ताकद लावली असून स्टार प्रचारक मोदींनादेखील सभांसाठी निवडणुकीच्या आखाड्यात उतरवलं आहे. सोलापूर जिल्ह्यातील भाजपच्या प्युअर सहा जागेसह महायुतीमधील घटक पक्ष असलेल्या शिंदे सेना आणि अजित पवार राष्ट्रवादी पक्षाच्या उमेदवारांसाठी १३ नोव्हेंबर रोजी सोलापूरच्या होम मैदानावर सभा घेण्याचं नियोजन करण्यात येणार आहे. या ठिकाणीच्या सभेतून मोदी महाविकास आघाडीवर टिकेचे बॉम्बगोळे फोडून राज्यात पुन्हा महायुतीचं सरकार आणण्यासाठी मतदारांनी युतीच्या पाठिशी ताकद लावण्याचे आवाहन करतील.

भाजपच्यावतीने सोलापूर जिल्ह्यात अक्कलकोट, सोलापूर शहर उत्तर, दक्षिण, मध्य, माळशिरस आणि पंढरपूर सहा ठिकाणी निवडणूक लढवली जात आहे. तर एकनाथ शिंदे सेनेतर्फे बार्शी, सांगोला, करमाळा या विधानसभेच्या जागेवर त्याशिवाय अजित पवार राष्ट्रवादी गटाच्यावतीने माढा, मोहोळ या ठिकाणी उमेदवार उभे केले आहेत.

महायुतीच्या या उमेदवारांच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सोलापुरात सभा ठेवण्याचे नियोजन आहे. त्यासाठीच्या हालचालींना वेग आला आहे. या सभेतून मोदी हे शरद पवार, सुशीलकुमार शिंदे यांच्या कारभार टिका करुन महायुतीच्या बाजूने मोहोलाचा धुराळा उडवतील. त्यांच्या सभेनं निवडणुकीचं वारं फिरेल, असा भाजपच्या प्रदेश पातळीवरील नेतेमंडळींचा कयास आहे.

### शरद पवार हैं तो क्या...

शरद पवारांनी सोलापूर जिल्ह्यातील विधानसभेच्या निवडणुकीत लक्ष घातलं आहे, स्वत:च्या पक्षाच्या उमेदवारांबरोबरच महाविकास आघाडीमधील सगळ्या मित्र पक्षांचे उमेदवार निवडून आणण्यासाठी मोठी ताकद लावली आहे, हे लक्षात घेऊन भाजपनंदेखील कंबर कसली असून मोदी यांची सभा सोलापुरात घेणं हा त्याचाच एक भाग असल्याचं मानलं जातंय.

# ‘मॅनेज उमेदवारी’चा मोहोळमध्ये ‘करेक्ट कार्यक्रम’!

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून विधानसभा लढण्यासाठी इच्छुकांची उठलेली मांदियाळी, विधानसभा निवडणुकीत दिसणारा राजन पाटील अन् उमेश पाटील यांच्यामधील कडवा वाद, अनगर अप्पर तहसील कार्यालयासह अनगर विरुद्ध मोहोळ असा सुप्त संघर्ष आदी मुद्यांवरुन अगोदरच प्रचंड चर्चेत असलेल्या मोहोळ विधानसभा मतदार संघात अक्षरश: विधानसभा निवडणुकीची खिचडी झाली आहे. इथल्या विधानसभेच्या निवडणुकीला वेगळेच धुमारे फुटलेत. शरद पवार अन् अजित पवार अशा दोन राष्ट्रवादी गटांच्या उमेदवारांमध्ये लढत असं वरवरचं चित्र दिसलं असलं तरी ‘मॅनेज’ उमेदवारीच्या प्रकरणावरुन उठलेला चर्चेचा धुराळा इथं कायम आहे. ‘लोकसभेला केलेल्या उपकारची विधानसभेला परत फेड’ असा पॅटर्न सिद्धी कदमांच्या उमेदवारीत राबविण्याचा प्रयत्न झाला. ‘आतून’ खूप राजकारण झालं. अनगरकर पाटलांनी मोठी ताकद लावून आमदार यशवंत मानेंना पुन्हा आमदार करण्यासाठी सोंगट्या टाकल्या, ज्यानं मोहोळची निवडणूक वेगळ्या वळणावर मानल्याचं जात आहे.**

विशेषत्वे, विद्यमान आमदार यशवंत माने यांच्या विजयाचा मार्ग सुकर होण्यासाठी सोलापूर-अनगर-अकलूज-बारामती या ट्रॅकवर ‘आतून’ अनपेक्षित राजकारणाच्या खेळ्या खेळल्या गेल्या. खूप काही शिजवलं गेलं. सिद्धी कदम यांना उमेदवारी देण्यास शरद पवारांना भाग पाडलं, त्यातून ‘मॅनेज’ उमेदवारीचा जन्म झाला होता, अशा चर्चे चं उठलेलं आग्या मोहोळ या तालुक्यात उठलं आहे.

लोकसभेच्या निवडणुकीवेळी शरद पवार, सुशीलकुमार शिंदे आणि विजयसिंह मोहिते-पाटील हे ज्येष्ठ नेते एकत्र आले होते. महायुतीच्या त्यापेक्षा भाजपच्या उमेदवारांना पाडून महाविकास आघाडी पर्यायानं राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट आणि काँग्रेस उमेदवार निवडून येणं मोठं आव्हान होतं.यावेळी पवार, शिंदे आणि मोहिते-पाटील यांनी अनेक तह करत लोकसभेची निवडणूक पार पाडली. माढ्यातून धैर्यशील मोहिते-पाटील यांना विजयी करण्यासाठी सुशीलकुमार शिंदे आणि प्रणिती शिंदे यांची मदत झाली तर प्रणिती शिंदेंना सोलापूर लोकसभेच्या मतदार संघातून निवडून येण्याला अकलूजकर मोहिते-पाटील यांची मदत झाली. माढा आणि सोलापूरची जागा जिंकण्यसात महाविकास आघाडीला यश तर आलंच पण १५ वर्षांनंतर पवार, शिंदे आणि मोहिते-पाटील यांनी एकत्र येणं शिवाय सोलापूर जिल्ह्यासाठी राजकारणासाही तह करुन मोट आवळणं लोकसभेच्या निवडणुकीदरम्यान महत्त्वाचं झालं होतं.

दरम्यान, त्याचाच परिपाक मोहोळ विधानसभेच्या शरद पवार राष्ट्रवादी शरद पवार गटाचा उमेदवार निवडताना दिसला. लोकसभेला एकमेकांना पुरक राहात, मदत करण्याचा जो उपकार झाला, त्याची परतफेड मोहोळ विधानसभेच्या निवडणुकीत शरद पवार गटाची उमेदवारी देण्यात देण्यात झाली, अशा चर्चेचा आरोही तालुक्यात उठली आहे.

### उमेदवारीवरुन संघर्ष समितीत परस्पर विरोधी भूमिका

अनगरकर पाटील यांच्या विचाराच्या उमेदवाराच्या विरोधात मोहोळ तालुका संघर्ष समिती उमेदवार देईल, असे उमेश पाटील यांनी जाहीर केले होते. संजय क्षीरसागर आणि राजू खरे यांचं नावं अंतीम टप्यात होती. मात्र सिद्धी कदमांना उमेदवारी देण्यावरुन संघर्ष समितीत संतापाची लाट पसरली. समितीमधील दीपक गायकवाड, उमेश पाटील वगैरे सदस्यांनी शरद पवार यांची भेट घेऊन उमेदवार बदलण्याची मागणी केली. यावेळी संजय क्षीरसगार यांचं नाव बाजूला करुन राजू खरे यांचं नाव शरद पवारांपुढं आणण्यात आलं. पहिल्यापासून शरद पवार गटाची उमेदवारी क्षीरसागर यांनाच मिळणार अशी चर्चा होती. तसा दावाही केला जात होता.पण राजकारण झालं. ‘लक्ष्मी’दर्शन घडविण्याच्या आश्वासनांची खैरात झाली. क्षीरसागर यांचे वर्चस्व नको म्हणून अवघ्या काही तासात खूप काही शिजवलं गेलं. राजू खरेंनाच उमेदवारी द्या, म्हणून मोठा घाट घातला. खरे यांच्याकडून खरोखरच ‘माया’ ओतली जाणार म्हणून त्यांच्या नावाचा आग्रह धरण्यात आला. संघर्ष समितीमधील सदस्य संजय क्षीरसागर हे अपक्ष उमेदवारी ठेवतील असं मानलं जातंय. त्यांची उमेदवारी राहिल्यास संघर्ष समितीमधील सर्वपक्षीय नेते त्यांचं काम करणार का? हा मुद्दा महत्त्वाचा आहे. कारण समितीमधील सदस्यांसाठी ‘माये’च्या पेट्या ओतण्याची तयारी खरेंनी अगोदरच करुन ठेवत तसं आतून ’सेटिंग केलंय’, असं बोलबाला आहे.









### आमदार यशवंत माने यांना अनगर अप्पर तहसील कार्यालय, लक्ष्मीपुत्र,

अनगर विरुद्ध मोहोळ सुप्त संघर्ष, मराठा अन् धनगर आरक्षण आदी मुद्यांवर जड जाणारी निवडणूक सोपी करण्यासाठी ‘मॅनेज’ उमेदवार काढण्याच्या हालचाली झाल्या. सिद्धी कदम या तुल्यबळ नसलेल्या अत्यंत नवख्या चेहऱ्याला आमदार यशवंत माने या सक्षम उमेदवाराच्या विरोधात उभा करण्याचा करेक्ट कार्यक्रम पडद्याआडून केल्याचा बोलबाला मतदार संघात आहे.

### कदमांचं नावांनं उठलेलं आग्या मोहोळ कायम

राष्ट्रवादी शरद पवार गटाची उमेदवारी सिद्धी कदम यांना घोषित झाल्यानंतर मोहोळ मतदार संघात भूकंपाप्रमाणं धक्का बसला. अक्षरश:चर्चेचं आग्या मोहोळ उठलं. संजय क्षीरसागर, राजू खरे यांची नावं बाजूला सरुन सिद्धी कदम यांना उमेदवारीच दिली कशी? यावरुन संतापाचं वातावण पेटलं.

### केंद्रस्थानी राजन पाटलांचं नाव

मोहोळ मतदार संघात राजन पाटील यांचं तगडं नेतृत्व आहे. ‘ते सांगतील तोच आमदार होतो, असं मागच्या काही टर्मला झालंय’ मात्र या खेपेस त्यांच्या मर्जीमधील उमेदवार यशवंत माने यांना निवडून आणताना विविध मुद्यांवर मोठ्या अडचणी होत्या.तेव्हा राजन पाटील यांनी राजकारणाच्या वेगळ्या सोंगट्या टाकल्या. शरद पवार, सुशीलकुमार शिंदे आणि अकलूजकर मोहिते-पाटील यांना एकसुत्रात बांधत आमदार यशवंत माने यांच्यासाठी ‘मॅनेज’ उमेदवारी मोहोळच्या आखाड्यात आणली होती.तेच केंद्रस्थानी होते, अशा चर्चेचा माहोल मतदार संघात आहे.



### संजय क्षीरसागारांची कोंडी

लोकसभा निवडणुकीपूर्वीपासून लोक संपर्कात असलेल्या संजय क्षीरसागर यांची विधानसभेला कोंडी झाली आहे. त्यांना शरद पवार गटाची उमेदवारी मिळणार हे निश्चित मानलं जात होतं. त्यांनी निवडणुकीसाठीची मोर्चेबांधणी जोरदारपणे केली आहे. मात्र, शरद पवार गटांनं त्यांची उमेदवारी कापली. त्यातून त्यांची भलतीच कोंडी झाली आहे. उमेदवारी कायम ठेवावी म्हटलं तर पक्षाची अधिकृत उमेदवारी नसल्यानं पक्षीय पातळीवरची मतं मिळणं अवघड त्यांतून विजय कसा मिळणार? निवडणुकीत विजय दिसत नसल्यानं कोट्यवधीचा खर्च करुन तर काय उपयोग? त्यातून उमेदवारी काढल्यास मुख्यत्वे, धनगर समाजासह नेतृत्व मानणारी अन्य समाजाची मोठी व्होट बँक अलगदपणे आमदार यशवंत मानेंकडे जाणार. हे सर्व लक्षात घेता, भाजपमध्ये राहून कोंडी फुटेना, नेतृत्वाच्या उभारीला न्याय मिळेना म्हणून शरद पवार गटात गेलेल्या संजय क्षीरसागरांची कोंडी अधिकच झाल्याची चर्चा आहे.